MHAU100004672023

# संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक १५९/२०२३ मध्ये निशाणी क्र. १ वर आदेश
# (दिलीप विरुद्ध मिलींद व इतर)

०१. प्रस्तुतची फिर्याद फिर्यादीने आरोपींविरुद्ध भा.द.वि. कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हयाची दखल घेण्यासाठी दाखल केली आहे.

०२. फियादचे, फिर्यादीच्या पडताळणी जबाबाचे व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले. फिर्यादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. भा.द.वि. कलम ३२३, ५०४ व ५०६ व फौजदारी प्रक्रियां संहिताचे कलम २०४ चे वाचन केले.

०३. प्रस्तुतच्या फिर्यादद्वारे फिर्यादीने आरोपींनी संगणमताने त्याला मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केल्याचे व पोलीसांना तक्रार देवुन सुध्दा त्यांनी कारवाई न केल्याचे आरोप केले आहेत. सदर बाब फिर्यादीने त्याचे शपथेवरील पडताळणी जबाबमध्ये सुध्दा केली आहे. तसेच सदर कथनाच्या अनुषंगाने फिर्यादीने पोलीसांत दिलेल्या तक्रारी सुध्दा अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. त्यामुळे

फिर्यादीच्या आरोपांमध्ये प्रथमदर्शनीय तथ्य दिसुन येत आहे. सबब याद्वारे आरोपींविरुद्ध फौजदार प्रक्रियां संहिताचे कलम २०४ अन्वये भा.द.वि. कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ च्या गुन्हयांकरिता आदेशिका पारित करण्यात येत आहे.

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2024.04.10 17:06:25 +0530

**(व्ही. एच. खेडकर)**

दिनांकः– १०/०४/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खुलताबाद,

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्रातील/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***आकाश एस. चव्हाण***<br>***(लघुलेखक ग्रेड–३)*** |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),<br>खुलताबाद |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :– | १०/०४/२०२४ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर/ आदेशावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | :– | १०/०४/२०२४ |
| निकालपत्र/आदेश अपलोड केल्याचा दिनांक | :– | १०/०४/२०२४ |